सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २३५

विषय क्रमांक :- १(ज)

दिनांक :- २०/०६/२०२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० चे कार्यक्षेत्रातील कॉलेज कॉर्नर ते आपटा पोलीस चौकी पर्यंतच्या मार्गास कबड्डी भिष्माचार्य स्वर्गीय बच्चूभाई हलवाई मार्ग असे नामकरण करणेबाबत तेथील नागरिकांनी मागणी केली आहे. त्यांचे मागणीचा विचार करता, कॉलेज कॉर्नर ते आपटा पोलीस चौकी पर्यंतच्या मार्गास कबड्डी भिष्माचार्य स्वर्गीय बच्चूभाई हलवाई मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Nimbalkar सौ.वर्षा निंबाळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रोडजी मोहिते. D.P.Suryavanshi महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.करण किशोर जामदार यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिरज शहरातील मिरज ते टाकळी रस्त्यावरील स.नं.१८३/१ क्षेत्र हे ०.५९ आर इतके क्षेत्रातील नागरिकांनी सदर कॉलनीस झुलेलाल कॉलनी असे नामकरण करणेसाठी मागणी केलेली आहे. तरी सदर कॉलनीतील नागरिकांच्या मागणीनुसार मिरज ते टाकळी रस्त्यावरील स.नं.१८३/१ क्षेत्र हे ०.५९ आर इतके क्षेत्रातील कॉलनीस कॉलनीस झुलेलाल कॉलनी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.करण जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.रोडजी मोहिते

D. P. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.भारती हेमंत दिगडे आणि ॲड. स्वाती नितीन यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ सांगली शहरातील मारुती चौक ते शास्त्री उद्यान पर्यतच्या रस्त्यास बिजली मल्ल कै.संभाजीराव पवार (आप्पा) मार्ग असे नामकरण करणेसाठी नागरिकांच्या मागणीनुसार प्रभाग क्र.१४ सांगली शहरातील मारुती चौक ते शास्त्री उद्यान पर्यतच्या रस्त्यास बिजली मल्ल कै.संभाजीराव पवार (आप्पा) मार्ग असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे

D.P.Suryavanshi.
महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.अप्सरा महेंद्र वायदंडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली प्रभाग क्र.१९ मधील विजय कॉलनी मधील मनपा मालकीच्या स.नं.१३३/१ ब ओपन स्पेस मधील क्रिडांगणास कै.विजया रमेश सिंहासने क्रिडांगण असे नामकरण करणेसाठी नागरिकांच्या मागणीनुसार सांगली प्रभाग क्र.१९ मधील विजय कॉलनी मधील मनपा मालकीच्या स.नं.१३३/१ ब ओपन स्पेस मधील क्रिडांगणास कै.विजया रमेश सिंहासने क्रिडांगण असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना / हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विनायक सिंहासने

D.P.Suryavanshi.
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २३९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेचे शहर विस्तारीकरण झपाटयाने होत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील विस्तारीत भागामध्ये व शहराच्या अंतर्गत भागांमध्ये मोठ्या प्रमाणात व्यावसायीक स्तरावर (कमर्शियल) सदनिका (अपार्टमेंट) उभारल्या जात आहेत. परंतु, बांधकाम व्यावसायीक अथवा विकसन कर्ते यांच्याकडून या सदनिकांच्या सुरक्षेबाबत पुरेशा उपाय योजना अंमलात आणल्या जात नसलेचे कित्तेक वेळा निदर्शनास आलेले आहे. याचाच एक भाग म्हणजे सदनिकांच्या (अपार्टमेंट) आवारामध्ये एखाद्या गंभीर गुन्हा अथवा चोरी, महिलांची छेड़छाड़,चेन स्नॅचिंग,वाहन चोरी इ.प्रकार घडल्यास प्रत्यक्ष दर्शी पुरावा अथवा CCTV चे चित्रीकरण न मिळाल्याने पोलीसांच्या तपास कार्यात अडचणी निर्माण होतात त्यामुळे अपराधीही मोकाट सुटतात. नुकताच सांगलीच्या उपजिल्हाधिकारी दर्जाच्या महिला अधिकाऱ्यांवर अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने हल्ला करुन त्यांना जखमी केले असे प्रकार कुठेतरी थांबणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेकडून मनपा क्षेत्रात कुठेही व्यावसायीक स्तरावर (कमर्शियल) सदनिका (अपार्टमेंट) उभारण्यासाठी बांधकाम परवानी मागणी केलेस विकसीत होत असलेल्या इमारतीच्या ठिकाणी पुरेसे CCTV बसविणे व त्यांची योग्य निगा राखण्याच्या अटीवर बांधकाम परवानगी देणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने ठराव सर्वानुमते मंजुर

प्रभारी सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.सौ.नीता मोहिते महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४०

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.हरिदास पंडीत पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगलीवाडी मधील ज्योतीबा मंदिर परिसरातील कॉलनीमध्ये महानगरपालिकेने अंदाजे २ कोटी इतका निधी खर्च करुन नविन ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. सदरची ड्रेनेज लाईनला लेव्हल सापडत नसल्यामुळे सदरची ड्रेनेज लाईन कार्यान्वीत झालेली नाही. सदर ठिकाणी ड्रेनेज पंप हाऊस बांधलया शिवाय सदरची ड्रेनेज लाईन कार्यान्वीत करता येणार नसल्याने महानगरपालिकेने सदर परिसरामध्ये ड्रेनेज पंप स्टेशन उभारणे गरजेचे आहे. याकरीता १०००० चौ.फुट खाजगी जागेची आवश्यकता महानगरपालिकेस आहे. याकरीता महानगरपालिकेने दि.१२/०५/२०२२ रोजी दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून खाजगी मिळकत धारकांना सांगलीवाडी येथे ड्रेनेज पंपींग स्टेशनसाठी कोणत्याही व्यक्ती /शेतकरी स्वत:ची जागा कायमस्वरुपी खरेदी देणेस तयार असल्यास त्यांनी दि.३१/०५/२०२२ पर्यंत महानगरपालिकेकडे तसा प्रस्ताव त्यांना जागेचा मोबदला कोणत्या स्वरुपात म्हणजेच आर्थिक / TDR / FSI पैकी अथवा अन्य कोणत्या स्वरुपात पाहिजे त्याचाही उल्लेख करुन सादर करावा असे आवाहन केलेले होते. त्यास अनुसरुन सांगलीवाडी येथील स.नं.४२ मधील मिळकत धारक श्री.धोंडीराम भिमराव पाटील व श्री.रंगराव भिमराव पाटील यांनी रस्त्यालगत असलेली त्यांचे मालकीची १० गुंठे (१०००० चौ.फुट) खुल्या जागेचा मोबदला आर्थिक स्वरुपात हवा असलेचा उल्लेख करुन महानगरपालिकेस कायमस्वरुपी खरेदी देणेस तयार असलेबाबत लेखी अर्जाद्वारे संमती दर्शविलेली असून, चालू बाजार भावाप्रमाणे जागेचा मोबदला मिळावा अशी मागणी केलेली आहे. सबब, महानगरपालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करुन नागरिकांच्या सोयीसाठी टाकलेली नविन ड्रेनेज लाईन तातडीने कार्यान्वीत करणे गरजेचे असल्याने खाजगी वाटाघाटीने तातडीने सदर जागा घेवून नविन ड्रेनेज पंप हाऊस उभारणेकामी जिल्हाधिकारी,सांगली कार्यालयामार्फत भूसंपादन करणेस व भूसंपादन प्रक्रियेत निश्चित होणारे मुल्य आदा करणेस किंवा महानगरपालिका स्तरावर खाजगी वाटाघाटीने / अन्य विहित पद्धतीने भूसंपादन करणेस व त्यांचे होणारे मुल्य आदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते D.P.Suryavanshi महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४१

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.गजानन शिवाजी आलदर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रातील सांगलीवाडी प्रभाग क्र.१३ मधील मनपा शाळा क्र.९ ची जुनी इमारत ही धोकादायक बनलेली असूनही तेथे विद्यार्थ्यांचे वर्ग भरविले जात आहेत. सदर मनपा शाळा क्र.९ ची धोकादायक इमारत पाडून त्या पाठीमागेच नव्याने बांधलेल्या इमारतीची डागडुजी करुन तेथे शाळा भरविली तर मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत वाढ होवू शकते यासाठी सदरची जुनी इमारत पाडून नव्याने बांधणेत आलेल्या इमारतीमध्ये डिजीटल युक्त शाळा भरविणेबाबत प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग यांनी पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक सिंहासने.

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे.

D.P. Suryavanshi
महापौर,

प्रशा.अधिकारी (शिक्षण)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे आणि श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सन २०१७-१८ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तरीय) मधून सांगली येथील जुना कुपवाड रोड कोरे ॲसेट्स ते रेल्वे गोडावून जवाहर हौसिंग सोसायटी पर्यंत पु.प.रस्ता हॉटमिक्स डांबरीकरणाने सुधारणा करणेची कामगिरी स्थायी समिती सभा क्र.३४/२०१७-१८ दि.०९/०५/२०१७ अन्वये र.रु.१,४०,४९,१००/- मात्रची मंजूर आहे. उक्त जागेवर मे.जिल्हा न्यायालयाची स्थगिती आदेश असलेने दि.२०/१२/२०१७ रोजी कामगिरी बंद ठेवणेत आलेली आहे. सदर कामगिरी न्यायप्रविष्ठ असलेकारणाने वेळेत पूर्ण होणे अशक्य आहे, सबब, वरील निधी हा जिल्हा नियोजन मार्फत आला असलेकारणाने त्याची खर्च करणेची मुदत मार्च २०२३ पर्यत आहे. यामुळे वरील कामगिरी मधून शिल्लक राहिलेली र.रु.५४,२७,०००/- मात्र मधून (१) सांगली येथील स.नं.२६८/१ब माता रमाई आंबेडकर उद्यान विकसीत करणे या कामगिरीसाठी र.रु.२५ लक्ष व (२) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक ते लक्ष्मी मंदिर (कुपवाड फाटा) पर्यतचा रस्ता हॉटमिक्स डांबरीकरण करणे र.रु.२९,२७,०००/- ची कामगिरीचा प्रस्ताव मा.जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विष्णु माने ठराव सर्वानुमते मंजुर

D.I.Suryavanshi

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.फिरोज हुसेन पठाण यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महाराषष्ट्र शासनाने सन २०२० चा गुंठेवारी कायदा पारित केला. सदर कायद्यान्वये गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करण्याची मुदत दि.३१ डिसेंबर २०२१ रोजी संपलेली आहे. तरी महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून व गुंठेवारी नागरिकांसाठी तयार करणेत आलेल्या कायद्याचा फायदा नागरिकांना होणेच्या दृष्टीकोनातून सन २०२० च्या गुंठेवारी कायद्यानुसार गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करण्यासाठी मार्च २०२३ पर्यत मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता आहे.

सूचक :- सौ. कांचन कांबळे

सौ. कांचन कांबळे.

अनुमोदक :- श्री. प्रकाश मुळके.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

स.स.न.र.

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

भारत अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांचे वतीने देशातील अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के) अंतर्गत सन २०१४ मध्ये शासन निर्णय करणेत आला व त्यानुसार महाराष्ट्रातील ज्या शहरांचा अल्पसंख्यांक बहुलक्षेत्र म्हणून समावेश करणेत आला त्यामध्ये सां.मि.कु.मनपा चा समावेश करणेत आला आहे. तरी सदर योजनेचा लाभ अभयनगर परिसरातील नागरिकांना होणेसाठी जुना स.नं.२४७/अ/२अ व नविन १४/अ/२ मधील मनपा खुल्या भूखंडावर सदभावना मंड़प बांधणे कामगिरीचा सविस्तर प्रस्ताव शासन मान्यतेसाठी प्रशासनाने सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री संजय मेढे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.गजानन मोहिते

D.P.Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २४५

विषय क्रमांक :- १(ज)

दिनांक :- २०/०६/२०२२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभागाकडून अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात त्या अन्वये सांगली सि.स.नं.६३५४/८९ येथील मनपाच्या खुल्या जागेत व्यायाम शाळा बांधकामास शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडून निधी उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. संजय मेढे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्रीमती शोभा सोहिते.

D. J. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ **दिनांक :- २०/०६/२०२२**

ठराव क्रमांक :- २४६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.मनगू आबा सरगर आणि श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

महानगरपालिका क्षेत्रातील शहर सांगली येथील स.नं.१६/१ (जुना स.नं.२४९/१) या जमिनीवर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र.१०० प्राथमिक शाळा व क्रिडांगण (PS &PG) हे आरक्षण प्रस्तावित आहेत. मात्र सदर ठिकाणी गेल्या २५ ते ३० वर्षापासून नागरी वस्ती झाली असून, मोहमदीया कॉलनी व उर्मिला नगर परिसर म्हणून सदर परिसर ओळखला जातो. सदरठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने रस्ते,गटारी,पथदिवे इ.सर्व सुविधा पुरविल्या गेल्या आहेत. गुंठेवारी अधिनियम २००१ च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेकडे गुंठेवारी नियमितीकरणासाठी अंदाजे १५ वर्षापासून प्रस्ताव दाखल आहेत. सदर आरक्षणाने या परिसरातील साधरण ६३ राहती घरे बाधित होतात. सदर परिसराच्या कक्षेत मनपा शाळा नं. २३ भाग्योदय विद्यामंदिर,बिरनाळे इंग्लिश स्कूल, बर्वे प्राथमिक शाळा दुधाळ यांची शिक्षण संस्था, नवमहाराष्ट्र शिक्षण संस्था, सुपर इंग्लिश स्कूल इ. अनेक शाळा अस्तित्वात आहेत. तसेच, स.नं.१६/१ मध्ये ज्या लोकांनी घरे बांधलेली आहेत ती लोके गरजू व गरीब असून सदर आरक्षण कायम करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय केले सारखे होईल तसेच सदर जागा संपादन करणे महानगरपालिकेला आर्थिक परवडणारे नाही. महानगरपालिकेची सद्याची आर्थिक परिस्थिती पाहता व इतर महानगरपालिकेच्या शाळांची अवस्था व पटसंख्या पाहता तसेच वरील नमुद सर्व शाळा एकाच परिसरा जवळ असले कारणाने स.नं.१६/१ वर आरक्षण ठेवणे योग्य होणार नाही. ज्या जागांवर घरे बांधणेत आलेली आहेत त्या घरांवरील आरक्षण उठवून त्यांनी गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र देणेबाबत व खुल्या भूखंडावरील आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये फेरबदल होवून, रहिवास विभागात समाविष्ठ करणेस फेरबदल प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस तसेच सदर प्रस्तावास मा.शासन मान्यता मिळले या अटीस अधीन राहून या भूखंडावरील गुंठेवारी नियमितीकरणासाठी दाखल झालेले प्रस्तावाचे गुंठेवारी नियमितीकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.संतोष पाटील ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मिरंजन आवटी. महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २४७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.८ मधील टी.डी.लाड शाळा परिसरातील हसबे घर ते सादर घर ते गेजगे घरापर्यंतचा रस्ता मुरुमीकरण करणे अंदाजपत्रकीय र.रु.२,६०,५००/- मात्रचे कामी मंजूर मक्तेदार श्री.मिथून बसू गोगिकर यांना अपात्र करुन, त्यांची सुरक्षा अनामत रक्कम पक्क्या खाती जमा करणेस व त्याकामी होणारे नुकसान मक्तेदार यांचे देय होणाऱ्या बिलातून कपात करुन, सदर कामाची फेरनिविदा काढणेस व मक्तेदार श्री.मिथून बसू गोगिकर यांचे नाव काळ्या यादी समाविष्ठ करणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती दि.२७/०५/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवर सादर केला होता. सदर मक्तेदारावर मा.स्थायी समितीने प्रशासनाकडे फेरप्रस्ताव सादर करुन अहवाल मागविणेस आदेशित केले आहे. परंतु सदर उपरोक्त कामगिरी ही पावसाळ्याचे दिवस असलेने परिसरातील सद्यस्थिती पाहता काम करणे गरजेचे आहे. सदर मंजूर मक्तेदारास वेळोवेळी प्रशासनानेही कळवून देखील कामगिरी करणेस टाळाटाळ करीत आहे व प्रशासनाकडून ही अहवाल येणेस विलंब लागत आहे. मा.स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार सदर मक्तेदार श्री.मिथून बसू गोगिकर यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक श्री.सोउनी मोहिते

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

ठराव क्रमांक :- २४८

दिनांक :- २०/०६/२०२२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

महानगरपालिका क्षेत्रातील शहर कुपवाड येथील स.नं.१०५,१०६ या जमिनीवरी महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र.३४० गार्डनचे आरक्षण प्रस्तावित आहे. मात्र सदर ठिकाणी गेल्या १५ ते २० वर्षापासून नागरी वस्ती झाली असून पंचशिल कॉलनी,ज्ञानेश्वर कॉलनी, गणेश कॉलनी, कृष्णा कॉलनी, गंगानगर परिसर म्हणून सदर परिसर ओळखला जातो. सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या वतीने रस्ते गटारी पथदिवे इ.सर्व सुविधा पुरविल्या गेल्या आहेत. गुंठेवारी अधिनियम २००१ च्या तरतुदीनुसार महानगरपालिकेकडे गुंठेवारी नियमितीकरणासाठी अंदाजे १५ ते२० वर्षापासून प्रस्ताव दाखल आहेत. सदर आरक्षणाने या परिसरातील साधरणत: ८० टक्के राहती घरे बाधित होतात. सदर परिसराच्या कक्षेत पाटबंधारे विभागाचे मोठे गार्डन अस्तित्वात आहे. तसेच कुपवाड प्रभाग क्र.८ च्या परिसरातील विनायकनगर संजीवनी हनुमान मंदिर परिसरामध्ये कै.राजारामबापू पाटील गार्डन महापालिकेने विकसीत केले आहे. तरी सदर स.नं.१०५,१०६ मध्ये ज्या लोकांनी घरे बांधलेली आहेत ती लोक गरजू व गरीब असून, सदर आरक्षण कायम करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय केले सारखे होईल तसेच सदर जागा संपादन करणे महानगरपालिकेला आर्थिक परवडणारे नाही. वरील परिसरामध्ये स.नं.१०५,१०६ वर गार्डनचे आरक्षण ठेवणे योग्य होणार नाही. याबाबत मा.नाम.पालकमंत्री, मा.महापौरसो,मा.आयुक्तसो यांचेकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा केलेला आहे. तरी ज्या जागांवर घरे बांधणेत आलेली आहेत त्या घरांवरील आरक्षण उठवून त्यांनी गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रमाणपत्र देणेबाबत व खुल्या भूखंडावरील आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये फेरबदल होवून, रहिवास विभागात समाविष्ठ करणेस फेरबदल प्रस्ताव मा.शासनाकडे मान्यतेस्तव सादर करणेस तसेच सदर प्रस्तावास मा.शासन मान्यता मिळले या अटीस अधीन राहून या भूखंडावरील गुंठेवारी नियमितीकरणासाठी दाखल झालेले प्रस्तावाचे गुंठेवारी नियमितीकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.सोहनी मोहिते

D. P. Suryavanshi

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२

दिनांक :- २०/०६/२०२२

ठराव क्रमांक :- २५५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे आणि सौ.भारती हेमंत दिगडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दि.२३ मे २०२२ रोजी मा.आयुक्तसो यांचे दि.२१ मे २०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्यालय, सांगली येथे छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथील सर्व मान्यता प्राप्त क्रिडा संस्था खेळाडू पालक व पदाधिकारी यांची संयुक्त बैठक पार पाडली. सदर बैठकी मध्ये ठरलेनुसार एक समिती गठीत केली जाईल त्यामध्ये १० तज्ञ प्रशिक्षक व खेळाडू आणि प्रशासनातील दोन अधिकारी असतील तसेच मा.महापौर हे या समितीचे अध्यक्ष असतील या सर्वांनी मिळून एक तंत्रशुद्ध अशा सर्व खेळाचा समावेश असणारा स्टेडियम विकसन आराखडा तयार करुन, सदरचा आराखडा मा.महासभेच्या मान्यतेसाठी सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. रोडजी मोहिते.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. विनायक सिंहासने.

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका